**MHAH**220007992023

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १४१/२०२३ निशाणी क्रमांक २० वरील आदेश**
**वैभव अर्जुनसिंग परदेशी व इतर**
**विरुद्ध**
**सुनिता सुरेशसिंग परदेशी व इतर**

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी नि.क्र.१२ वरची पुर्तता करुन त्यांची कैफियत स्विकारण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

२. सदर प्रतिवादींच्या कथनानुसार, वादीने सदर दावा प्रतिवादींविरुध्द वाटप व जाहीर ठरावासाठी दाखल केलेला आहे. समन्स मिळाल्यानंतर प्रतिवादी हजर झालेले आहेत. मात्र काही महत्वाची कागदपत्रे उपलब्ध होऊ शकली नाहीत. त्यामुळे प्रतिवादींना ९० दिवसांच्या मुदतीत कैफियत देता आली नाही. प्रतिवादींनी दि.१८/१२/२०२३ रोजी नि.क्र.१२ च्या अर्जासोबत कैफियत दाखल केलेली आहे. तथापि सदर आदेशाची पुर्तता न केल्यामुळे सदर आदेश आपोआर रद्द झालेला आहे. सदर प्रतिवादींना प्रस्तुत आदेशाची माहित न झाल्यामुळे मुदतीत पुर्तता करता आली नाही. अशा परिस्थितीत सदर दाव्याचे कामकाज गुणदोषावर चालवुन न्याय निर्णय होण्यासाठी सदर प्रतिवादींना त्यांची कैफियत वादपटलावर देण्याची संधी मिळावी व त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियतचा आदेश रद्द होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. वादीच्या कथनानुसार सदर प्रतिवादींना  कैफियत दाखल करण्याची पुरेशी संधी देण्यात आलेली आहे. प्रतिवादींनी नि.क्र.१२ वरील आदेशानुसार पुर्तता न केल्यास दिलेले कारण संयुक्तीक नाही. सदर प्रतिवादी दाव्यात विनाकारण विलंब करीत आहेत हे स्पष्ट दिसून येते त्यामुळे सदर अर्ज नामंजुर करण्या यावा अशी विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा प्रतिवादीं विरुध्द वाटप व इतर अनुषंगिक मागण्यांसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादींनी दाव्यातील नि.क्र.१२ वरील आदेशाची पुर्तता केलेली नाही. त्यानंतर प्रस्तुत अर्ज दाखल करण्यापुर्वी वादीकडून देखील दाव्यात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. अशा परिस्थितीत सदर प्रतिवादीस वादीची दाव्यातील मागणी आव्हानित करणे व दाव्याचा निर्णय गुणावगुणावर होण्यासाठी सदर प्रतिवादीची कैफियत वादपटलावर असणे आवश्यक व गरजेचे आहे. अशा परिस्थितीत केवळ विलंबाच्या कारणावरुन सदर प्रतिवादींना त्यांची कैफियत दाखल करण्यापासून वंचीत ठेवणे न्यायोचीत होणार नाही. सबब, पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. प्रतिवादींचा प्रस्तुत अर्ज (निशाणी क्र.२०) त्यांनी वादीस खर्च र.रु.८००/- सदर आदेशापासून १४ दिवसांच्या आत देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वरील अटीस अधीन राहून सदर दाव्यात प्रतिवादी क्र.१ व २ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात आलेला आहे.

SHIVAJI N THAPEKAR
Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.02.23 11:39:15 +0530

ठिकाण: कर्जत
दिनांक: २३.०२.२०२६

**(एस. एन. थापेकर)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कर्जत